दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी... epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक
● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३३८ वा ● बुधवार, ता. २५ जून २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

## त्रिभाषा सूत्रावर सर्व संबंधितांशी बोलूनच अंतिम निर्णय- फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली त्रिभाषा सूत्रासंदर्भात आज मुंबई येथील शासकीय निवासस्थानी आढावा बैठक संपन्न झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले की, त्रिभाषा सूत्रासंदर्भात साहित्यिक, भाषा तज्ज्ञ, राजकीय नेते आणि इतरही सर्व संबंधितांशी चर्चा करुनच अंतिम निर्णय घेण्यात येईल.

या विषयावर सांगोपांग चर्चा झाल्यानंतर सर्व राज्यांची स्थिती सर्वांसमोर मांडावी, नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत मराठी मुलांचे अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिटच्या अनुषंगाने नुकसान होऊ नये, यांसह इतरही पर्यायांवर सर्वांसाठी समग्र सादरीकरण करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.



मराठी भाषेचे अभ्यासक, साहित्यिक, राजकीय नेते यासह सर्व संबंधितांसमोर याचे सादरीकरण आणि सल्लामसलतीची प्रक्रिया राबविण्यात यावी, असे या बैठकीत ठरले. ही सल्लामसलतीची प्रक्रिया पूर्ण झाल्यावरच अंतिम निर्णय घेण्यात येईल, असेही यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. त्यामुळे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे हे आता पुढची सल्लामसलतीची प्रक्रिया प्रारंभ करणार आहेत.

या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे संचालक आणि शिक्षण विभागातील अधिकारी उपस्थित होते.

# शक्तिपीठ महामार्ग भूसंपादन प्रक्रियेस मंत्रिमंडळाची मंजुरी




**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील साडेतीन शक्तिपीठे, दोन ज्योतिर्लिंगे आणि १८ तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेला राज्य मंत्रिमंडळ बैठकीत अखेर मंजुरी मिळाली आहे. यासाठी तब्बल २० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, लवकरच भूसंपादनाची प्रक्रिया पुन्हा सुरू होणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर थांबवण्यात आलेली ही प्रक्रिया आता पुन्हा गती घेणार आहे. शक्तिपीठ महामार्गासाठी वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग या १२ जिल्ह्यांतील २७ हजार ५०० एकर जमीन संपादित होणार आहे. या भूमी अधिग्रहणामुळे मोठ्या प्रमाणात शेतजमीन संपणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व चिंता व्यक्त होत आहे. हा महामार्ग वैजनाथ (परळी), औंढा नागनाथ (हिंगोली), माहूर रेणुकामाता (नांदेड), तुळजाभवानी (उस्मानाबाद), विठोबा मंदिर (पंढरपूर), कोल्हापूरची अंबाबाई (महालक्ष्मी), सिद्धरामेश्वर (सोलापूर), अक्कलकोट, गाणगापूर, कारंजा, नृसिंहवाडी आणि औदुंबर अशा प्रमुख तीर्थक्षेत्रांना जोडणार आहे. या महामार्गामुळे धार्मिक पर्यटनास चालना मिळणार असून, शक्तिपीठ यात्रेचा एकात्मिक विकास हे यामागचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. या महामार्गावरून झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत काही मंत्र्यांनी नाराजी व्यक्त केल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. मंत्री प्रकाश आबिटकर व हसन मुश्रीफ यांनी शक्तिपीठ महामार्गाला स्थानिक पातळीवर होत असलेल्या विरोधाची बाब चर्चेत मांडल्याची माहिती आहे. शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच पुढील पावले टाकावीत, अशी भूमिका काही मंत्र्यांनी घेतली आहे. या महामार्गामुळे अनेक गावांच्या वसाहती, शेती व चरनभुमी संपुष्टात येणार आहेत. त्यामुळे स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. काही ठिकाणी आंदोलनेही होण्याची शक्यता असून, भूसंपादन दर, पुनर्वसन, मोबदला या बाबींबाबत राज्य सरकारला स्पष्ट आणि पारदर्शक पद्धतीने कार्य करावे लागणार आहे. शक्तिपीठ महामार्गामुळे धार्मिक पर्यटन, स्थानिक अर्थव्यवस्था आणि रोजगारास चालना मिळणार असल्याचा सरकारचा दावा आहे. मात्र यासाठी लागणाऱ्या हजारो एकर शेतजमिनीमुळे शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांच्या पोटावर गदा येणार आहे, अशी टीका विरोधक व सामाजिक कार्यकर्ते करत आहेत.




## नुरील भोसले यांच्या अरुंधतीस राष्ट्रीय पुरस्कार

### तेलंगणा सरकारकडून गौरव

**अहमदनगर । प्रतिनिधी**

येथील चित्रकार नुरील प्रभात भोसले यांना सहावे ऑल इंडिया कला स्पर्धा प्रदर्शनात तृतीय क्रमांकाचे राष्ट्रीय पारितोषिक मिळाले. युवा विकास पर्यटन व संस्कृती विभाग तेलंगणा सरकारच्या वतीने या कला स्पर्धा प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. हैदराबाद येथील स्टेट गॅलरी ऑफ आर्ट येथे कला स्पर्धा प्रदर्शन पार पडले. यामध्ये भारतभरातून एकूण २ हजार कलाकारांच्या कलाकृतींनी सहभाग घेतला होता. त्यापैकी १५० कलाकृती प्रदर्शनासाठी निवडण्यात आल्या. त्यातून तृतीय क्रमांकाचे पारितोषिक राहुरी तालुक्यातील चित्रकार नुरील भोसले यांच्या अरुंधती या व्यक्तीची चित्रास तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. हे चित्र कागदावरती जलरंग या माध्यमातून रंगविले असून, त्याचा आकार २४ बाय ३२ इंच आहे. पर्यटन, संस्कृती व हेरिटेज विभाग (तेलंगणा सरकार) विशेष सचिव जयेश रंजन यांच्या हस्ते भोसले यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. भोसले यांना यापूर्वी देखील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पारितोषिक प्राप्त झाले आहेत. प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या या हैदराबादच्या पारितोषिकमुळे सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## पंढरपूर वारीत ‘अ-जात’ संत गणपती महाराजांच्या चरित्रग्रंथाचे प्रकाशन



**भडगाव । प्रतिनिधी**

संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर ‘एक दिवस तरी वारी अनुभवावी’ या उपक्रमात आज भडगाव येथे संत गणपती महाराज यांच्या जीवनकार्यावर आधारित ‘समाजसुधारक गणपती महाराज’ या डॉ. बाळ पदवाड लिखित चरित्र ग्रंथाच्या द्वितीय आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, उपक्रमाचे संयोजक अविनाश पाटील, सामाजिक कार्यकर्ते विशाल विमल, संत तुकडोजी महाराजांचे वारसदार सुबोधदादा महाराज, संविधान समता दिंडीचे संयोजक ह.भ.प. श्यामसुंदर सोन्नर, भारत घोगरे गुरुजी, मुकुंद काळे, सुरेंद्र माणिक, अमिष गावंडे आदी मान्यवर उपस्थित होते. संत गणपती महाराज हे वारकरी संप्रदायातील क्रांतिकारी विचारवंत संत होते. त्यांनी एक शतकापूर्वीच जातिव्यवस्थेविरोधात आवाज उठवला. मंगरूळ दस्तगीर (जिल्हा अमरावती) येथे त्यांनी अ-जात या पंथाची स्थापना केली, जो आजही जातिभेदाविना कार्यरत आहे. त्यांच्या कार्याची सुरुवात स्वतः आंतरजातीय विवाह करून व आपल्या अनुयायांचेही आंतरजातीय विवाह लावून झाली. या प्रसंगी बोलताना वक्त्यांनी सांगितले की, आजच्या सामाजिक सापेक्षतेत संत गणपती महाराजांचे विचार अत्यंत प्रेरणादायी व मार्गदर्शक आहेत. त्यांनी दिलेला मानवतेचा आणि अ-जाततेचा संदेश वारकरी परंपरेतील मूल्यांना अधिक व्यापक आणि समावेशक करणारा ठरतो. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी पुस्तकाच्या माध्यमातून संत गणपती महाराजांचे कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याची गरज व्यक्त केली.



## दीपश्री कर्पे हिच्या घवघवीत यशाचा गौरव; सत्कार समारंभ उत्साहात

**अहमदनगर । प्रतिनिधी**

येथील सिद्धिविनायक हॉस्पिटलचे संचालक डॉ. दीपक कर्पे आणि दंतचिकित्सक डॉ. जयश्री कर्पे यांची कन्या दीपश्री कर्पे हिने नुकत्याच जाहीर झालेल्या २०२५ राष्ट्रीय वैद्यकीय प्रवेश परीक्षेत ५८८ गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले. तिच्या यशाबद्दल वरद कॉलनी परिवारातर्फे दीपश्री हिचा आणि तिच्या पालकांचा भव्य सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात आदर्श शिक्षक संदीप काटे म्हणाले, जिद्द, मेहनत आणि ध्येयवेड्या इच्छाशक्तीच्या जोरावर दीपश्रीने मिळवलेले हे यश संपूर्ण कॉलनीसाठी प्रेरणादायी आहे. तिने विद्यार्थ्यांसमोर एक आदर्श उभा केला आहे. प्रवीण परदेशी यांनी आपल्या मनोगतात दीपश्रीचे कौतुक करताना तिला उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सत्काराला उत्तर देताना दीपश्रीने सांगितले, बालपणापासूनच डॉक्टर होण्याचे स्वप्न होते. आई-वडील, शिक्षक आणि कुटुंबीयांच्या पाठींब्यामुळेच मी आज हे पाऊल टाकू शकले आहे. अजून मोठी मजल मारायची आहे. हीच दीपश्रीसाठी एक उज्वल वैद्यकीय वाटचाल सुरू होण्याची नांदी ठरो, अशा शुभेच्छा सर्वांनी व्यक्त केल्या. यशसोहळ्यात किशोर घोडके, बंटी येवलेकर, रुपेश पवार, सुजित चव्हाण, आदेश गुंगे, अंजली परदेशी, जयश्री येवलेकर, यांच्यासह अनेक पालक आणि विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी परीसरातील नागरिक, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अंजली परदेशी आणि जयश्री येवलेकर यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाचे संचालन श्रीनिवास एल्लाराम यांनी तर आभार प्रदर्शन किशोर घोडके यांनी केले.



## खतांचे गोडाऊन ताब्यात घेऊन शेतकऱ्यांना वितरित करू- सावंत

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

शासनाने बफर स्टॉक केलेली रासायनिक खते शेतकऱ्यांना तत्काळ उपलब्ध करून द्यावेत अन्यथा स्वतंत्र भारत पक्ष शेतकरी संघटना शेतकरी संघटना महिला आघाडी अहिल्यानगर व जिल्ह्यातील शेतकरी बफर स्टॉक केलेली गोडाऊन ताब्यात घेऊन रासायनिक खतांचे वितरण शेतकऱ्यांना करणार असल्याचा इशारा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना प्रांताधिकारी श्रीरामपूर किरण सावंत यांचे मार्फत देण्यात आले.

नगर जिल्ह्यात पेरणीलायक समाधानकारक पाऊस सुरू आहे. त्यामुळे शेतकरी खरीप हंगाम पिकांची लागवड करीत आहेत पणं पिकांची पेरणी करताना कोणतेच रासायनिक खते उपलब्ध नाहीत पीक वाढ आणि पोषण होण्यासाठी रासायनिक खतांची अत्यंत आवश्यक व गरजेचे असते पणं शासनाने रासायनिक खतांचा बफर स्टॉक करून ठेवलेला असल्याने बाजारात कोणत्याच प्रकारचे रासायनिक खते उपलब्ध नाहीत त्यामुळे खरीप हंगाम पीक धोक्यात आले आहेत

शासनाने ३० जून पर्यंत जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बफर स्टॉक केलेली रासायनिक खते तत्काळ उपलब्ध करून द्यावीत अन्यथा स्वतंत्र भारत पक्ष, शेतकरी संघटना, शेतकरी संघटना महिला आघाडी अहिल्यानगर व जिल्ह्यातील शेतकरी नगर जिल्ह्यात शासनाने बफर स्टॉक केलेले रासायनिक खतांची गोडाऊन ताब्यात घेऊन ते शेतकऱ्यांना वितरित करणार असल्याचा इशारा दिला आहे . या निवेदनावर स्वतंत्र भारत पक्ष शेतकरी संघटना जिल्हाअध्यक्ष श्री नीलेश शेडगे,महिला आघाडी जिल्हाअध्यक्ष श्रीमती सुनीताताई वानखेडे पा., उपाध्यक्ष श्री नवनाथ दिघे,श्रीरामपूर तालुकाध्यक्ष श्री प्रकाश जाधव, नेवासा तालुकाअध्यक्ष श्री त्रिंबक भदगले, संगमनेर तालुकाअध्यक्ष श्री रमेश शिंगोटे ,कर्जत जामखेड तालुकाध्यक्ष श्री लालासाहेब सुद्रिक,शेवगाव पाथर्डी तालुकाअध्यक्ष श्री हारून सय्यद ,राहुरी साहेबराव जगताप,आशा महांकाळे कोमल वानखेडे, शीतल पोकळे, मंदाताई गमे,मधू काकड,रवी वानखेडे,श्रीराम त्रिवेदी, बाळासाहेब घोगरे,बाबासाहेब गायकवाड,रावसाहेब डांगे,युवराज देवकर , भरत गलांडे आदी शेतकऱ्यांच्या निवेदन वर सह्या आहेत

# देखना है कल,तो चलाओ सायकल!

## आरोग्य,पर्यावरण रक्षणाचा संदेश देत सायकलस्वारांची पंढरी वारी

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरकडे सुरू झालेल्या सायकल वारीतून पर्यावरण रक्षण व आरोग्य संवर्धनाचा जागर होत आहे. ‘‘देखना है कल तो चलाओ सायकल‘‘ या प्रेरणादायी ब्रीदवाक्यासह शेवगाव येथून शेकडो सायकलस्वार जय जय विठ्ठल, माऊली माऊलीचा जयघोष करत पंढरपूरकडे रवाना झाले. शनिवारी रात्री ११ वाजता शेवगाव सायकल असोसिएशनच्या वतीने ही वारी २३० किमीचे अंतर पार करत पंढरपूर येथे यशस्वीरीत्या दाखल झाली.



या सायकलवारीत एकूण ५१ सायकलस्वारांनी सहभाग घेतला. वारीत सहभागी सायकलस्वारांचे वय १२ ते ६३ वर्षे इतके विविध होते. यात राजवीर उगले, हर्ष देशपांडे, श्रुती चितळे व सिद्धेश देहाडराय या लहान सायकलपटूंनी विशेष आकर्षण निर्माण केले, तर खजिनदार वसंत सुरवसे, डॉ. संजय लड्डा व डॉ. भागिनाथ काटे हे ज्येष्ठ सायकलस्वारही जोमाने सहभागी झाले. उन्हाचा तडाखा, दमणूक, उलटा वारा अशा अडचणी असूनही प्रत्येक वारीकरात अपार उत्साह व जिद्द दिसून आली. वरील वारीचे अत्यंत उत्कृष्ट नियोजन डॉ. मुकुंद दारकुंडे, निलेश केवळ, सुनील गवळी, डॉ. योगेश फुंदे, प्रदीप बोडखे, निळकंठ लबडे, दुर्गेश काथवटे यांनी केले. यासोबत नानाभाऊ देशपांडे, शिरिष घनवट, माऊली बडे, संभाजी कोठुळे, प्रणव भोसले, मयूर रोडी, रविकिरण पंडित, योगेश शिंदे व सोमनाथ नारळकर यांचा सहभाग विशेष उल्लेखनीय होता. वारी पंढरपूरला पोहोचल्यानंतर लातूर सायकल असोसिएशनच्या वतीने आयोजित प्रदक्षिणा व रिंगण सोहळ्यात सहभागी झालेल्या ५००० सायकलस्वारांमध्ये शेवगावचे वारीकरीही सहभागी झाले. या रिंगण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय क्रीडामंत्री रक्षाताई खडसे होत्या. त्यांनी ‘‘संडे सायकल डे‘‘ आणि ‘‘फिट इंडिया‘‘साठी ही वारी उपयुक्त असल्याचे सांगितले. शेवगाव सायकल असोसिएशनचे सचिव कैलास जाधव यांनी सांगितले की, ‘‘सायकल वारी ही केवळ शरीराला नवचैतन्य देणारी नसून ती आत्मिक समाधान देणारीही असते. विठोबा चरणी माथा टेकताना सर्व थकवा निघून जातो आणि सकारात्मक ऊर्जा मिळते.‘‘ सोलापूर, लातूर, निफाड, नवी मुंबईसारख्या ठिकाणांहून देखील अशीच आषाढी सायकल वारी सुरू असून ही चळवळ पर्यावरण आणि आरोग्यासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

पेस्ट कंट्रोल
झुरळ, डास, मुंग्या, कोळी , पाल, गोम, गोचीड, पिसवा, उंदीर, घुस, लाईटचे किडे, वाळवी, ढेकुन इ.
या सारख्या किटकांपासुन मुक्तता.
औषधाचा वास नाही, रंग नाही, साइड इफेक्ट नाही.
शिवाय घरात जास्त आवरा आवर नाही.
अपेक्स बायोटेक पेस्ट कंट्रोल
जेऊर (बा.), अहिल्यानगर.
संदीप पवार - 98 23 75 17 76

ईश्वर टी ॲण्ड नाष्टा सेंटर
संपुर्ण महाराष्ट्रातील खवैयांची आवडती चव
सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी
प्रो.प्रा. ईश्वर जायभाय- 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

# श्रीमती अबट मायदेवी गुरुदत्ताशाहा हायस्कूलमध्ये पालक मेळावा उत्साहात संपन्न




**भिंगार । प्रतिनिधी**

इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी विद्यालयात पालक मेळावा मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, मानसिक आणि सामाजिक प्रगतीसाठी पालक, शिक्षक आणि शाळा यांच्यातील सहकार्य वाढवणे या हेतूने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रमोद तोरणे, विश्वशंकर प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अनभुले तसेच विद्यालयाच्या पर्यवेक्षिका शिंदे मॅडम यांनी पालकांचे स्वागत करून, पालकांमधून एक स्त्री प्रतिनिधी अनिता रामदास लालबेगी व एक पुरुष प्रतीनिधी अन्सार नजीर शेख यांची पालकांमधून निवड करण्यात आली. सुरकूटला मॅडम यांनी मेळाव्याचे उद्दिष्ट स्पष्ट केले. शाळेतील दहावीच्या विद्यार्थ्यांची यावर्षीची शैक्षणिक तयारी, प्रश्नसंच, सराव चाचण्या, मार्गदर्शन सत्रे आणि सुधारणात्मक उपाययोजना यांची सविस्तर माहिती देण्यात आली. वर्गशिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत प्रगतीचा आढावा पालकांसमोर मांडला. काही पालकांनी आपल्या सूचना व अनुभवही शेअर केले. विद्यार्थ्यांच्या मोबाईल वापराचे नियमन, पालकांनी अभ्यासात दिलेले सहकार्य आणि घरी शांत अभ्यास वातावरण यावरही सखोल चर्चा झाली. विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागाचे सहाय्यक विभागीय अधिकारी प्रमोद तोरणे यांनी विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये पालक व शिक्षक किती महत्त्वाचे असतात याचा सविस्तर वृत्तांत पालकांना समजावून सांगितला. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यालयाच्या परिवेक्षिका शिंदे मॅडम उपस्थित सर्व पालकांचे आभार मानले आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शाळा-पालक एकत्र काम करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.हा पालक मेळावा विद्यार्थ्यांच्या यशाकडे वाटचाल करण्यासाठी एक प्रेरणादायी आणि उपयोगी पाऊल ठरला.





# मोकाट जनावरांचा बंदोबस्त कधी करणार?

## भाजी विक्रेते आणि व्यावसायिकांचा संतप्त सवाल

**भिंगार । प्रतिनिधी**

उपनगरात मोकाट जनावरांची झुंज लागून मोठ्या प्रमाणात व्यावसायिकांचे नुकसान झाले. जवळपास तासभर ही झुंज सुरू होती, त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. गेल्या अनेक दिवसांपासून भिंगार शहरातील बाजारपेठ व परिसरात मोकाट जनावरांचा वावर प्रचंड वाढला आहे. या जनावरांमुळे दुकानदार आणि भाजी विक्रेत्यांचे नुकसान होत आहे. बाजारपेठेत येणाऱ्या ग्राहकांच्या वाहनांनाही धक्का बसतो, वाहनांची पडझड होते, नुकसान होते. या जनावरांचे शेण बाजारातच पडते, त्याची योग्य विल्हेवाट लागत नसल्याने अनेकदा नागरिक घसरून पडतात.

पावसाळ्यात या शेणामुळे दुर्गंधी पसरते, आरोग्य धोक्यात येते. अलीकडेच बाजारात विक्रेत्यांनी विखुरलेले खाद्यपदार्थ खाण्यासाठी दोन मोकाट जनावरे एकत्र आली आणि त्यांच्यात झुंज लागली. ही झुंज इतकी तीव्र होती की जवळपासच्या दुकानदारांची नासधूस झाली. अनेक विक्रेत्यांचे मालाचे नुकसान झाले. झुंज थांबवण्याचा प्रयत्न नागरिकांनी केला, मात्र दोन्ही जनावरे थेट नागरिकांच्या दिशेने धावल्यामुळे कोणीच पुढे जाऊ शकले नाही.

या प्रकारामुळे बाजारात मोठी घबराट पसरली होती. याआधीही भाजी विक्रेत्यांनी व व्यावसायिकांनी स्थानिक प्रशासनाकडे मोकाट जनावरांबाबत तक्रार केली होती, मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. प्रशासनाचे हे दुर्लक्ष भाजी विक्रेत्यांमध्ये संतापाचे कारण ठरत आहे. विशेष म्हणजे शहरातील आठवडी बाजार, तसेच इतर ठिकाणी रोजच मोकाट जनावरे फिरताना दिसतात. यामुळे नागरिक व व्यावसायिक धास्तावले आहेत. सद्य:स्थितीत झालेल्या घटनेमुळे काही विक्रेत्यांचे नुकसान झाले असून, भविष्यात कोणत्याही नागरिकास इजा झाल्यास जबाबदारी कोणाची? असा थेट सवाल आता भाजी विक्रेत्यांमधून उपस्थित केला जात आहे. स्थानिक प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा, अशी जोरदार मागणी होत आहे.



# योगामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते- दळवी

## डोके शाळेत विद्यार्थ्यांना योगाचे धडे

**अहमदनगर । विजय मते**

''नियमित योगासन व व्यायामामुळे शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढते. कोरोना महामारीच्या काळात याची महती सर्वांनाच पटली होती. योगाचा अवलंब हा आरोग्यदायी जीवनशैलीचा महत्त्वाचा भाग आहे,'' असे प्रतिपादन योग शिक्षक घनश्याम दळवी यांनी केले. निर्मल नगर येथील डोके विद्यालयात योग दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी विशेष योग सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात योगशिक्षिका कांचन मल्होत्रा, सविता थोरवे, स्नेहा थोरवे, कार्तिक खेडकर यांनी सहभाग घेतला.
या प्रसंगी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संभाजी पवार आणि प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका रीबेका क्षेत्रे उपस्थित होत्या.
कार्यक्रमात विद्यार्थ्यांना योगासने कशी करावीत, कोणती आसने मन व शरीरासाठी लाभदायक असतात, याचे प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन कांचन मल्होत्रा व सविता थोरवे यांनी केले.
मुख्याध्यापिका रीबेका क्षेत्रे यांनी सांगितले की, ''योग हे केवळ शरीराचे नव्हे, तर मन, मेंदू आणि आत्म्याचे संतुलन राखण्याचे प्रभावी माध्यम आहे. विद्यार्थ्यांनी लहान वयातच योगाची सवय लावून घेतल्यास त्याचा उपयोग आयुष्यभर होतो.''
कार्यक्रमास संज्योत बर्वे, मंजू नवगिरे, सुजाता कर्डिले, आशा धामणे, राणी राऊत, अभिषेक खामकर, किरण जाधव आदी मान्यवर आणि शिक्षकवृंद उपस्थित होते.

निंबळक माध्यमिक विद्यालयात

# आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



**नगर तालुका । प्रतिनिधी**

ग्राम विकास विद्या प्रसारक मंडळाच्या माध्यमिक विद्यालय, इसळक निंबळक येथे आज शनिवार, ता. २१ जून २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात पतंजली योग समिती, अहिल्यानगरचे जिल्हा संघटक योग शिक्षक मधुकर निकम व योग शिक्षक सचिन गवते यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिके करून दाखवली. त्यांनी योगाभ्यासाचे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होणारे फायदे स्पष्ट करत विद्यार्थ्यांमध्ये योगाबाबत जागरूकता निर्माण केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका संगीता जाजगे होत्या. या प्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# खुल्या राज्यस्तरीय २५ व्या टॉपर्स स्पीड स्केटिंग स्पर्धेचे आयोजन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील नामांकित टॉपर्स स्केटिंग अकॅडमी यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे २५ वी राज्यस्तरीय खुली स्पीड स्केटिंग स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा रविवार, ता. २९ जून २०२५ रोजी कै. पुंडलिकराव भोसले स्केटिंग रिंग, बुरुडगाव रोड, अहिल्यानगर येथे पार पडणार असून, सकाळी ९:३० वाजता स्पर्धेचा शुभारंभ होईल. या स्पर्धेत इनलाईन, रिक्रिएशन इनलाईन, क्वाड, टेनासिटी व इतर स्केट प्रकारांचा समावेश असून, वयवर्षे ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२, १४ आणि खुला गट (ओपन कॅटेगरी) अशा वेगवेगळ्या गटांमध्ये मुले व मुली यांचा सहभाग राहणार आहे. स्पर्धेत विजेत्या खेळाडूंना सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकांनी सन्मानित करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील स्केटिंग प्रेमी व स्पर्धकांसाठी ही एक सुवर्णसंधी असून, या स्पर्धेद्वारे आपली कौशल्ये सादर करण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धेबाबत अधिक माहिती व नावनोंदणीसाठी पुढील क्रमांकांवर संपर्क साधावा: प्रशांत पाटोळे - ८०८७८७०८९९, प्रदिप पाटोळे ८२७५१९१७७१ टॉपर्स स्केटिंग अकॅडमी तर्फे सर्व स्पर्धकांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# नगर अर्बन बँक ठेवीदारांना जुलै महिन्यात मिळणार ५०% रक्कम

## अवसायक गणेश गायकवाड




**अहमदनगर । प्रतिनिधी**

अवसायनात गेलेल्या नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे ठेवीदारांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे.

पाच लाखांपेक्षा जास्त ठेव असलेल्या ठेवीदारांना ठेव पावतीच्या ५० टक्के इतकी रक्कम जुलै महिन्यात मिळणार असल्याची माहिती बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांनी दिली. यासंदर्भात DICGC (डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन) यांच्याकडे ''ना हरकत प्रमाणपत्र'' (NOC) मिळवण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदर प्रमाणपत्र बँक प्रशासनास नुकतेच प्राप्त झाले असून, त्यामुळे रक्कम वितरणाची प्रक्रिया अधिकृतपणे सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

गायकवाड यांनी सांगितले की, पाच लाखांपेक्षा जास्त रक्कम असलेल्या आणि विहित नमुन्यातील क्लेम फॉर्म व KYC माहिती पूर्ण केलेल्या एकूण १९२६ ठेवीदारांना ठेव पावतीच्या ५० टक्के इतकी रक्कम मिळणार आहे. याआधी ठेवी परत करण्याचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे.

दुसऱ्या टप्प्यातील संबंधित प्रक्रिया जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सोबत पूर्ण करण्यात येईल, त्यानंतर ठेवीदारांच्या खात्यांमध्ये रक्कम थेट जमा केली जाणार आहे, असेही गायकवाड यांनी स्पष्ट केले.



मा. आमदार संग्राम जगताप व अहिल्यानगर महानगर पालिका आयुक्त डांगे यांच्याहस्ते नारायण आव्हाड यांचा ऐतिहासिक वस्तू संग्रहालय येथील कार्याबद्दल सन्मान करण्यात आला.

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**




# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिर उत्साहात

**नगरतालुका । प्रतिनिधी**

नेप्ती येथील स्वस्तिक मंगल कार्यालयात ''छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर'' पार पडले. उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील आणि तहसीलदार संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाच्या वतीने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नेप्ती मंडळातील सर्व गावांमधून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिरात नागरिकांना जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, नॉन क्रिमिलिअर दाखला यांसारख्या महत्त्वपूर्ण दस्तऐवजांचे वाटप करण्यात आले. यामुळे नागरिकांना शिक्षण, नोकरी व विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्याचा मार्ग मोकळा झाला. या शिबिरात महसूल विभागासह कृषी विभाग, समाजकल्याण विभाग, तसेच संजय गांधी निराधार योजना विभाग यांचाही सक्रीय सहभाग होता. या अंतर्गत संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजना, श्रावणबाळ योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, तसेच महाडीबीटी योजनांतर्गत फळबाग लागवड व शेतीसाठी अनुदान देण्यात आले.

कार्यक्रमास माजी जि.प. सदस्य अरुण होळकर, बी. आर. कर्डिले, सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले, रामराव कांडेकर, अनिल पवार, पांडुरंग कळमकर, अमोल चौगुले, अमोल औटी, सूरज पवार, सुभाष नेमाने, बाळासाहेब काळे, मंगल कांडेकर, शिवांजली कांडेकर, प्रकाश कांडेकर, लक्ष्मण कांडेकर, हौशीराम जपकर, गणेश वाळके, अभिजित शेटे, शिवाजी होळकर, तसेच परिसरातील गावांचे सरपंच, नायब तहसीलदार गणेश भानवसे, मंडळ अधिकारी प्रताप कळसे, तलाठी संतोष पाखरे, दीपक झेंडे, विनायक दिक्षे, सुवर्णा रांधवण, रुपाली म्हस्के, दिपाली विधाते, महसूल सहायक विक्रम सदाफुले, श्रीमती बुरा, कृषी सहाय्यक रावसाहेब नवले, रमेश खाडे, ग्रामसेविका अनुजा लाकूडझोडे, कोतवाल व सेतू केंद्राचे सर्व संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ''एकाच छताखाली अनेक सेवा'' ही संकल्पना या शिबिराच्या माध्यमातून यशस्वीपणे प्रत्यक्षात उतरवण्यात आली. नागरिकांना विविध खात्यांची कार्यालये न फिरता एकाच ठिकाणी आवश्यक सेवा मिळाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.



## 'धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज उत्कृष्ट ग्रामपंचायत पुरस्कारा'ने होणार १६ ग्रामपंचायतींचा सन्मान

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

तालुक्यातील नागरिकांना शासनाच्या विविध योजना समजावून सांगणे, सर्वसामान्य जनतेच्या अडचणी जाणून घेणे आणि तालुक्याच्या सर्वांगीण विकासासंदर्भात मोकळ्या चर्चेचे व्यासपीठ निर्माण करण्याच्या उद्देशाने आमसभा २०२५ चे आयोजन ता. २३ जून २०२५ रोजी तुळशीदास मंगल कार्यालय, श्रीगोंदा येथे करण्यात आले. या आमसभेच्या अध्यक्षस्थानी आ. विक्रम बबनराव पाचपुते होते, तर सभेच्या सचिवपदाची जबाबदारी गटविकास अधिकारी राणीताई फराटे यांनी पार पाडली. अध्यक्षीय भाषणात आमदार पाचपुते यांनी उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचे कौतुक करत, काही अधिकाऱ्यांना चुका सुधारून कार्यपद्धतीत सुधारणा करण्याचा सल्ला दिला. यावेळी त्यांनी एक महत्वपूर्ण घोषणा करत सांगितले की, ''धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज उत्कृष्ट ग्रामपंचायत पुरस्कार'' २०२५ पासून दिला जाणार आहे. हा पुरस्कार श्रीगोंदा-नगर मतदारसंघातील प्रत्येक जिल्हा परिषद गटातून दोन ग्रामपंचायतींची निवड करून, एकूण १६ ग्रामपंचायतींना दिला जाणार आहे. या पुरस्कारासाठी खालील प्रमाणे रोख रक्कम देण्यात येणार आहे: प्रथम क्रमांक ₹५५ लाख, द्वितीय क्रमांक रु २५ लाख, तृतीय क्रमांक रु ११ लाख, उर्वरित १३ ग्रामपंचायतींना प्रत्येकी रु १ लाख अशी एकूण रु १ कोटी ४ लाख रुपयांची पारितोषिके वितरित केली जाणार असल्याचे आमदारांनी स्पष्ट केले. या स्पर्धेसाठीचे अटी व नियम लवकरच जाहीर करण्यात येणार असून, निवड झालेल्या ग्रामपंचायतींना मिळणाऱ्या रकमेचा संपूर्ण खर्चाचा अधिकार संबंधित ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांना असेल, असेही त्यांनी सांगितले. या उपक्रमामध्ये मतदारसंघातील अधिकाधिक ग्रामपंचायतींनी सहभागी होऊन पुरस्कार मिळवावा, असे आवाहन आमदार पाचपुते यांनी केले. या प्रसंगी मा. तहसीलदार, मुख्याधिकारी श्रीगोंदा नगरपालिका, विविध विभागांचे शासकीय अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी, राजकीय पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अजित पवार कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक विद्यार्थ्यांचे यश

# कॅम्पस प्लेसमेंट मधील ११८ विद्यार्थी रुजू






**श्रीरामपूर । शफीक बागवान**

नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण महामंडळ बोर्डाच्या उन्हाळी २०२५ परीक्षेमध्ये अजितदादा पवार कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक वडाळा महादेवच्या विद्यार्थ्यांनी दरवर्षी प्रमाणे यावर्षीही उज्वल यश संपादन केले. मेकॅनिकल इंजिनियरिंग मध्ये प्रथम वर्षात प्रथम क'मांक आदित्य राजदेवे ६९.४४ गुण, द्वितीय क'मांक बत्तासे साहिल ६७.४३, तृतीय क'मांक बागवान अरमान ६७.२२ गुण. द्वितीय वर्षामध्ये प्रथम क'मांक अप्पासाहेब कातोरे ७२.४४ गुण, द्वितीय क'मांक सागर हिवराळे ७१ गुण व तृतीय क'मांक अभिषेक येवले ६८.५६ गुण. तृतीय वर्षातील सचिन जगदाळे याने ७६.४४ गुणांसह प्रथम क'मांक मिळवला. इलेक्ट्रिकल इंजिनियरिंग मध्ये प्रथम वर्षात प्रथम क'मांक अनिशा खान हिने ७५.२९ गुण, द्वितीय क'मांक यश अरगडे ६१.१७ गुण व तृतीय क'मांक मोरे ओंकार ६१.०६ गुण. द्वितीय वर्षामध्ये प्रथम क'मांक आढाव विश्वास ७२.१२ गुण, द्वितीय क'मांक बांद्रे महेश ७०.७१ गुण व तृतीय क'मांक आदित्य परदेशी ६८.४४ गुण. तृतीय वर्षामध्ये वैष्णवी कर्जुले ७६.६३ गुणांसह प्रथम, मगर भक्ती ७५.६३ व शेख साहिल ७१.५० यांनी अनुक'मे प्रथम, द्वितीय व तृतीय क'मांक मिळवला. इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकॉम्युनिकेशन मध्ये प्रथम वर्षात प्रथम क'मांक वाघमारे आशुतोष ७८.२४ गुण, द्वितीय क'मांक खपके प्रणव ७५ गुण,व तृतीय क'मांक निकिता खेडकर ७२.७१. द्वितीय वर्षामध्ये प्रथम क'मांक शीतल बाचकर ८१.११ गुण, द्वितीय क'मांक प्राजक्ता नवले ७६.२२ गुण व तृतीय क'मांक साक्षी कणसे ७६.११ गुण. तृतीय वर्षात चैतन्य कुलकर्णी ८१.५३ गुण, तवले प्रणाली ८०.५३ गुण व वीणा पिंपळे ८०.२९ गुणांसह यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय क'मांक मिळवला. कॉम्प्युटर टेक्नोलॉजी मधील प्रथम ऋतिका थोरात ८१.५३ गुण, द्वितीय क'मांक निकिता डापके ७९.६५ गुण, तृतीय क'मांक गोरे समृद्धी ७६ गुण. द्वितीय वर्षामध्ये प्रथम क'मांक अनिकेत पठारे ७९.५३ गुण, द्वितीय क'मांक तुपे साक्षी ७९.४१ गुण व तृतीय क'मांक दिया पटारे ७६.३५ गुण. तृतीय वर्षातील सिद्धेश रासकर ८३.४१ गुण, खैरनार ऋतुजा ८२.४७ गुण, गुंड प्रियांका ८२.३५ गुण मिळवून यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय क'मांक मिळवला. सिव्हिल इंजिनियरिंग मध्ये प्रथम वर्षात खिलारे निखील याने ६१.११ गुण मिळवून प्रथम क'मांक पटकावला. तृतीय वर्षातील गायत्री गोल्हार हिने ७९.६७ गुण मिळवून प्रथम क'मांक मिळवला तसेच पवार युवराज ७३.३३ गुण व जांभूळकर शुभम ७२.५६ गुण मिळवून यांनी द्वितीय व तृतीय क'मांक पटकावला. अडव्हांस डिप्लोमा इन इंडस्ट्रीयल सेफ्टी सेक्युरिटी मेनेजमेंट या अल्प कालावधीच्या अभ्यासक'मात पारधे निलेश याने ७८.६७ गुण मिळवून प्रथम क'मांक, व चोळके मोहिनी हिने ८० % गुण मिळवून अडव्हांस डिप्लोमा इन मेडिकल लेबोरेटरी टेक्नोलॉजी या अल्प कालावधीच्या अभ्यासक'मात प्रथम क'मांक मिळवला. विद्यार्थ्यांचे शिवा ट्रस्ट संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पवार, संस्थेचे संचालक दिलीप पवार, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्रीकांत पवार, जनसंपर्क अधिकारी सुशील लांडे, प्राचार्या पूनम बोधक, सर्व विभागप्रमुख अनिल गीते, सुनील खिलारी, प्रकाश जाधव, युवराज गायकवाड, मुस्कान खान, गणेश जोरे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले.

निकाल लागण्या पूर्वी महाविद्यालयात घेण्यात आलेल्या कॅम्पस प्लेसमेंट अंतर्गत तृतीय वर्षातील ११८ विद्यार्थी १ जून पासून विविध कंपन्यामध्ये रुजू झाले आहेत.

# ज्ञानोबा-तुकोबाच्या जयघोषात शनि महाराजांची पालखी पंढरपूरकडे रवाना



**पंढरपूरच्या भक्तांची २२ वर्षांची अखंड परंपरा**

**गेल्या २२ वर्षांपासून शनेश्वर दिंडीच्या प्रस्थानाला पंढरपूर येथील भक्तमंडळी आवर्जून उपस्थित राहतात. यंदाही ही परंपरा कायम ठेवत पंढरपूरच्या भक्तांनी सहभाग नोंदवला.**

**नेवासा । विजय खंडागळे**

श्री क्षेत्र शनिशिंगणापूर येथून शनि महाराजांची पालखी काल (२४ जून रोजी) ज्ञानोबा-तुकोबाच्या जयघोषात भाविक भक्तांच्या उपस्थितीत पंढरपूरकडे भक्ति सोहळ्यात रवाना झाली. टाळ-मृदुंगाच्या गजरात, अभंगवाणीतून विठुरायाच्या दर्शनाची ओढ वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. ''भेटी लागे जीवा / लागली सास'' अशा संत तुकाराम महाराजांच्या अभंगातून उपस्थित भाविक भक्तांनी अनुभवलेल्या भक्तिरसाने वातावरण भारून गेले होते. सकाळी ८ वाजता शनि देवाच्या पादुकांची पूजा श्री उदासी महाराज मठात विधीवतपणे विश्वस्त मंडळी व ग्रामस्थांच्या उपस्थितीत पार पडली. त्यानंतर भजनी मंडळांनी भजन सेवा सादर केली. फुलांनी सजवलेली पालखी, रांगोळीने नटवलेला मार्ग आणि टाळ-मृदंगाच्या गजरात पालखीचे प्रस्थान सुरू झाले. याप्रसंगी श्री ज्ञानेश्वर संस्थेचे विश्वस्त विश्वास मामा गडाख आणि पोलीस पाटील ॲड. सयाराम बनकर यांनी पालखी पूजन केले. विठुरायाच्या चरणी ''भरपूर पाऊस पडू दे, धनधान्य पिकू दे, शेतकरी राजा सुखी होऊ दे'' अशा प्रार्थना करण्यात आल्या. या पालखी सोहळ्यात वृद्ध, तरुण, महिला वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले. पालखी मार्गावर भोजन, चहा-नाश्ता, पाण्याची सोय तर ठिकठिकाणी पालखीचे स्वागत व नाश्त्याचे पॅकेट वाटप करण्यात येत आहे. शिंगणापूर आरोग्य केंद्राच्या वतीने वारकऱ्यांना औषधोपचाराच्या किटचे वाटप करण्यात आले. पालखी प्रस्थानाच्या वेळी देवस्थानचे अध्यक्ष भागवत बनकर, उपाध्यक्ष विकास बनकर, ॲड. सयाराम बनकर, विश्वस्त शिवाजीराव दरंदले, आप्पा कुऱ्हाट, पंढरीनाथ शेटे, रावसाहेब शेटे, सुरेश बनकर, बाळकृष्ण येळवंडे आदी उपस्थित होते.




# डाळ मिल प्रक्रिया उद्योगामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ शक्य - डॉ.ससाणे

**राहुरी । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांनी केवळ शेती उत्पादनावर भर न देता त्यावर प्रक्रिया करून अधिक मूल्य मिळवण्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. डाळ मिल प्रक्रिया उद्योग हे मूल्यवर्धनाचे महत्त्वाचे माध्यम असून, यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ शक्य आहे, असे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांनी केले. नॅशनल ॲग्रो फाऊंडेशन, चेन्नई व कृषी प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने डाळ मिल प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या दोन दिवसीय प्रशिक्षणाचे उद्घाटन डॉ. ससाणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. याप्रसंगी व्यासपीठावर प्रभारी सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे, कृषी प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. कैलास कांबळे, अन्न विज्ञान व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड, नॅशनल ॲग्रो फाऊंडेशनचे प्रकल्प व्यवस्थापक श्री. चंद्रकांत देवरे, सहयोगी प्राध्यापक डॉ. विलास साळवे, व सहाय्यक प्राध्यापक डॉ. गणेश शेळके उपस्थित होते. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश बीड जिल्ह्यातील कंबळेश्वर व यशवंत शेतकरी उत्पादक कंपनी या दोन संस्थांशी संलग्न शेतकरी प्रतिनिधींना डाळ प्रक्रिया तंत्रज्ञानाचे सखोल ज्ञान देणे हा होता. यावेळी बोलताना डॉ. सचिन नलावडे म्हणाले, ''शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या सरकारी उद्दिष्टामध्ये उत्पादक कंपन्यांची भूमिका महत्त्वाची आहे. हे प्रशिक्षण शेतकऱ्यांना तांत्रिक ज्ञान व व्यवसाय कौशल्य देऊन सक्षम बनवेल.'' प्रास्ताविक डॉ. विलास साळवे, स्वागत डॉ. कैलास कांबळे आणि आभार डॉ. विक्रम कड यांनी मानले. या प्रशिक्षणात डाळ मिल यंत्रसंचालना, गुणवत्तेची तपासणी, प्रक्रिया करताना घ्यावयाची काळजी, व विक्री नियोजन याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. कार्यक्रमाला नॅशनल ॲग्रो फाऊंडेशनचे प्रतिनिधी व प्रशिक्षणार्थी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सामाजिक सलोखा जपत शेतरस्ता केला खुला




**घोटण । शिवाजी घुगे**

शेवगाव तालुक्यातील घोटण येथील शेतकरी देविदास घुगे, रामानाथ घुगे, भीमराज घुगे व शंकर घुगे यांनी समाजात सौहार्दाचे उदाहरण घालून देत स्वतःच्या बांधावरून गरजू शेतकऱ्यांसाठी शेतात ये-जा करण्यासाठी रस्ता खुला केला. बिघडत चाललेल्या सामाजिक नातेसंबंधांमध्ये सलोखा जपत त्यांनी इतरांसाठी एक उत्तम आदर्श निर्माण केला आहे. मौजे घोटण येथील शिवाजी क्षीरसागर, गुलाब क्षीरसागर, पांडुरंग क्षीरसागर, बाबुराव क्षीरसागर, रामजी क्षीरसागर, संजय क्षीरसागर, बंडू क्षीरसागर, बाळासाहेब क्षीरसागर, क्षत्रू क्षीरसागर व शंकर क्षीरसागर या गरजू शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीपर्यंत पोहोचण्यासाठी जवळचा रस्ता उपलब्ध नव्हता. परिणामी, शेती कामांसाठी त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. या समस्येच्या निराकरणासाठी २०१६ सालापासून तहसीलदार व प्रांत अधिकाऱ्यांकडे अर्ज व विनंत्या करण्यात आल्या होत्या. मात्र, योग्य निर्णय न झाल्याने प्रश्न प्रलंबितच राहिला. समाजात संघर्ष न वाढवता, परस्पर सुसंवादाने प्रश्न मिटवावा या विचारातून दोन्ही बाजूंनी मतभेद बाजूला ठेवत रस्ता खुला करण्याचा निर्णय घेतला. या उपक्रमासाठी मंडल अधिकारी, कामगार तलाठी प्रशासकीय उपस्थितीत रस्ता अधिकृतपणे खुला करण्यात आला. यावेळी अर्जुन घुगे, शिवाजी घुगे, मच्छिंद्र क्षीरसागर, भाऊसाहेब क्षीरसागर, चंद्रकांत क्षीरसागर, संभाजी क्षीरसागर आदींचे मार्गदर्शन मोलाचे ठरले.

# आणीबाणीमुळे लोकांना लोकशाहीचे महत्व कळले

आज २५ जून, भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू करण्याच्या घटनेला आज ५० वर्ष पूर्ण झाली. बरोबर ५० वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे २५ जून १९७५ रोजी देशात आणीबाणी लागू झाली. १२ जून १९७५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधी यांची खासदारकी रद्द करून त्यांना पुढील सहा वर्ष निवडणूक लढवण्यास बंदी घातली. राजनारायण यांनी इंदिरा गांधी यांनी १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत गैरव्यवहार केला असा आरोप करून खटला दाखल केला होता. या खटल्याच्या निकाल १२ जूनला लागला. या निकालानंतर अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांची खासदारकी रद्द झाल्याने त्यांनी पंतप्रधानपद सोडावे अशी मागणी होऊ लागली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. परंतु सर्वोच्च न्यायालयाचे सुट्टीच्या काळातील न्यायाधीश व्ही. आर कृष्ण अय्यर यांनी उच्च न्यायालयाच्या निकालाला स्थगिती देण्यास नकार दिला मात्र सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत इंदिराजींना पंतप्रधान पदावर राहण्यास मुभा दिली. हा निर्णय आल्यानंतर पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी स्वतःची सत्ता टिकवण्यासाठी २५ जून १९७५ च्या रात्री देशात आणीबाणी लागू केली. आणीबाणीच्या मसुद्यावर तत्कालीन राष्ट्रपती फकरुद्दीन अली अहमद यांनी रात्री बारा वाजता स्वाक्षरी केली. आणीबाणी लागू झाल्यानंतर इंदिरा गांधी यांच्या हातात अनिर्बंध सत्ता आली. माध्यमांची मुस्कटदाबी सुरू झाली. जयप्रकाश नारायण, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, जॉर्ज फर्नांडिस, चौधरी चरणसिंग, मोरारजी देसाई, नानाजी देशमुख, मधु दंडवते, रामकृष्ण हेगडे, सिखंदर बख्त, लालूप्रसाद यादव, मुलायमसिंग यादव, रामविलास पासवान यांच्यासह अनेक मोठे नेते तसेच पत्रकारांना मिसा कायद्याखाली तुरुंगात डांबण्यात आले. आणीबाणीच्या २१ महिन्यांच्या कालावधीत ११ लाख लोकांना तुरुंगवास भोगावा लागला. सक्तीची नसबंदी आणि झोपडपट्टी हटवून शहरे सुशोभित करण्याच्या मोहिमेत लोकांवर जुलूम जबरदस्ती करण्यात येऊ लागले. त्यामुळे देशभर भीतीचे आणि संशयाचे वातावरण निर्माण झाले. सुरवातीला दहशतीत असणारे नागरिक या अन्यायाविरुद्ध नंतर रस्त्यांवर उतरू लागले. सामाजिक कार्यकर्ते, नेते, अभिनेते, कलाकार, बुद्धीवादी लोक, साहित्यिक असे सारे लोक आणीबाणीच्या विरोधात एकवटले. सर्व स्तरातून आणीबाणीला विरोध होऊ लागला. संपूर्ण देश आणीबाणीच्या विरोधात एकवटल्याचे पाहून इंदिरा गांधी यांनी आणीबाणी सैल करून १९७७ साली लोकसभेच्या निवडणुका घेतल्या. या निवडणुकीत इंदिरा गांधी, संजय गांधी यांचा दारुण पराभव झाला. विरोधी पक्ष असलेल्या जनता पार्टीचे सरकार आले. मोरारजी देसाई हे पंतप्रधान बनले. पण या सरकारमध्ये कमालीचा अंतर्विरोध होता. हाती आलेली सत्ता या विरोधी पक्षांना टिकवता आली नाही. पुढील निवडणुकीत इंदिरा गांधी पुन्हा पंतप्रधान बनल्या. आणीबाणी ही स्वतंत्र भारताच्या इतिहासातील काळे पर्व म्हणून ओळखली जाते. ४९ वर्षांपूर्वी घडलेल्या या दिवसातील घडामोडींनी देशाला लोकशाहिवरील श्रध्येचे महत्त्व काय आहे याची जाणीव करून दिली. भारताच्या इतिहासातील या घटनेची आठवण म्हणजे कोणाला चांगले वाईट ठरवणे नसून लोकशाहीची ताकद व सामर्थ्य यांचे स्मरण होय.





**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# शिक्षक भारतीच्या वतीने उपसंचालक डॉ. गणपत मोरे यांचा सन्मान

**पुणे । प्रतिनिधी**

विभागीय उपसंचालक कार्यालयात अनेक दिवसांपासून पूर्णवेळ उपसंचालक नसल्यामुळे अहमदनगर, पुणे आणि सोलापूर जिल्ह्यांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विविध प्रश्न प्रलंबित होते. मात्र, नुकतेच बदली होऊन आलेले आणि कर्तव्यदक्ष असे विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे यांनी पदभार स्वीकारताच, या प्रश्नांवर मार्ग काढण्यास सुरुवात झाली आहे. यावेळी शिक्षक भारती संघटनेच्या वतीने पुणे विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर आणि इतर पदाधिकाऱ्यांनी उपसंचालक डॉ. मोरे यांचे पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन स्वागत व सन्मान केला. याप्रसंगी कार्याध्यक्ष पाडेकर यांनी विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न मांडून, लवकरच सहविचार सभा आयोजित करून प्रश्नांची उकल व्हावी, अशी विनंती केली. उपसंचालक डॉ. मोरे यांनीही यास सकारात्मक प्रतिसाद देत, लवकरच सहविचार सभा घेऊन प्रलंबित प्रश्न मार्गी लावले जातील, असे आश्वासन दिले. डॉ. मोरे हे यापूर्वी लातूर विभागात उपसंचालक म्हणून कार्यरत होते. पुणे विभागात त्यांची नुकतीच बदली झाली असून, त्यांचे कामकाज गुणवत्तापूर्ण असल्याचे शिक्षण क्षेत्रात समाधानाने सांगितले जात आहे. त्यांच्या आगमनाने विभागात उत्साहाचे व आनंदाचे वातावरण दिसून आले आहे. त्यामुळे लवकरच अनेक समस्या मार्गी लागतील, अशी अपेक्षा शिक्षक व कर्मचाऱ्यांमध्ये व्यक्त केली जात आहे. कार्यक्रमास बी.आर. शिंदे, रोहिणी डावरे, दत्तात्रय आवारी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी शिक्षक भारती संघटनेचे खालील पदाधिकारी उपस्थित होते व त्यांनी शुभेच्छा दिल्या: राज्य सचिव सुनील गाडगे, विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, उच्च माध्यमिक जिल्हाध्यक्ष रामराव काळे, माध्यमिक विभाग जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, महिला जिल्हाध्यक्षा रूपाली कुरुमकर, जिल्हा उपाध्यक्ष संजय तमनर, सचिन जासूद, दादासाहेब कदम, कोषाध्यक्ष गोपाळ दराडे, प्रसिद्धीप्रमुख अमोल चंदनशिवे, तालुका अध्यक्ष संजय सुमंत शिंदे, नरेंद्र लहिरे, साई थोरात, संजय भालेराव, नानासाहेब खराडे, रूपालीताई बोरुडे, मफीज इनामदार, कल्पना चौधरी, अकील फकीर, बाबाजी लाळगे, दीपक फापाळे, वैभव चोथे, संपत वाळके, गणपत धुमाळ, विजय पांडे, प्रवीण मालुंजकर, अमोल तळेकर, संतोष नवले, श्याम जगताप आदी उपस्थित होते. सर्वांनी डॉ. गणपत मोरे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.





# सामान्य नागरिकांवरील अन्याय, अत्याचाराविरुद्ध लढा देण्याचे आवाहन– तवले

## मानवाधिकार न्यायिक सुरक्षा परिषदेची बैठक

**अहमदनगर । विजय मते**

येथील शासकीय विश्रामगृहात आंतरराष्ट्रीय मानवाधिकार न्यायिक सुरक्षा परिषद महाराष्ट्र राज्याची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत पदाधिकाऱ्यांना संघटनेच्या कामकाजाचे महत्त्व व कार्यपद्धती समजावून सांगण्यात आली.

यावेळी महाराष्ट्र राज्य दक्षिण अध्यक्ष विवेक तवले आणि पश्चिम अध्यक्ष रमेश माने यांनी कार्यकर्त्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात विवेक तवले म्हणाले, ''आजच्या सामाजिक परिस्थितीत केवळ पद भूषवणे हे पुरेसे नाही. कार्यकर्त्यांनी जनतेच्या न्यायासाठी लढा देणे, अन्याय–अत्याचाराविरुद्ध आवाज उठवणे, युवकांना सामाजिक कार्यात सहभागी करून घेणे ही काळाची गरज आहे. मानवाधिकार रक्षण ही केवळ जबाबदारी नसून, ती एक सामाजिक आणि नैतिक बांधिलकी आहे.'' या बैठकीमध्ये संघटनेच्या विस्ताराबाबत चर्चा करण्यात आली. अहिल्यानगर जिल्ह्यातील कार्यपद्धती, सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठीची रणनीती, तसेच कार्यकर्त्यांनी प्रभावीपणे काम करताना आपले कर्तव्य कसे पार पाडावे, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. परिषदेच्या माध्यमातून भ्रष्टाचार निर्मूलन, अन्याय–अत्याचारग्रस्तांना न्याय मिळवून देणे, आपत्ती काळात मदतकार्य करणे, वृक्षारोपण, रक्तदान शिबिरे, शालेय साहित्य वाटप अशा विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन सातत्याने केले जाते. कार्यक्रमाची माहिती देताना जिल्हाध्यक्ष अमोल कोठारी यांनी सांगितले की, ''संघटना ही केवळ सत्तेसाठी नाही, तर लोकसेवेसाठी आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या मदतीसाठी आम्ही सर्व पदाधिकारी तत्पर आहोत.'' या कार्यक्रमाला जिल्हा महासचिव अनिल नगरकर, कार्याध्यक्ष संतोष चव्हाण, नगर तालुकाध्यक्ष राजू अनमोल, तसेच महेश कुर्हे, अन्सार शेख, गणेश तवले, मंगेश खेडकर, पप्पू पाचारणे, सुजित शेळके, राजेश शिंदे, नितीन माने, सुधीर तवले, गणेश शेलार, सतीश गायकवाड, गणेश बोरुडे, भाऊसाहेब टीमकरे, राधेश्याम कोळगे, ऋषिकेश थोरात, रमजान सय्यद, रियाझ शेख, सतीश लोखंडे, राजू पठाण, संदीप तवले आदींसह जिल्ह्यातील अनेक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# विठ्ठल नामाच्या जयघोषात श्री क्षेत्र भगवानगड पालखीचे प्रस्थान

**पाथर्डी । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र भगवानगडाच्या पालखीचा पंढरपूरकडे प्रस्थान सोहळा मंगळवारी, ता. २४ जून रोजी उत्साही वातावरणात पार पडला.

श्री क्षेत्र भगवानगडाचे संस्थापक संत भगवानबाबा यांनी नारायणगडावर असताना मराठवाड्यातून पहिला पायी पालखी सोहळा सुरू केला होता.

ही परंपरा आजही अखंड सुरू असून, याच परंपरेनुसार पालखीचे प्रस्थान दुपारी ४ वाजता करण्यात आले. पालखीचे मुक्काम क्रमशः भारजवाडी, बावी, खोकरमोह, करंजवन, डिघोळ, जयवंतनगर, कुंबेफळ, पिपरी, कुर्डुवाडी, ढेकळेवाडी येथे होत अकराव्या दिवशी ती पंढरपूरमध्ये पोहोचणार आहे.

या पालखी सोहळ्यात अंभोरे येथील भोसले महाराज दिंडी, गुंजमुर्ती संस्थान, रामगड, विठ्ठलगड, राजा हरिश्चंद्र, कानिफनाथ खर्डा, संत भगवानबाबा संस्थान वडवणी, मायंबा संस्थान भालगाव, महालक्ष्मी संस्थान भोगलवाडी आदी विविध संस्थानांच्या दिंड्या सहभागी झाल्या आहेत. या पालखी सोहळ्याचे कुशल मार्गदर्शन ह.भ.प. महंत न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री करीत आहेत. प्रस्थानावेळी भगवानगड परिसरात हजारो भाविकांची मोठी उपस्थिती होती.



# जिजाऊंनी शिवाजी महाराजांसारखा राष्ट्रनायक घडवला– शफकत सय्यद

## जिजाऊ पुण्यतिथीनिमित्त मख़दुम सोसायटीतर्फे मोफत वह्यांचे वाटप

**अहमदनगर । आबीद खान**

राजमाता जिजाऊ माँसाहेब यांची पुण्यतिथी साजरी करत सर्जेपुरा येथील महापालिकेच्या अहिल्यादेवी होळकर प्राथमिक शाळा क्र. ११ आणि शहीद अब्दुल हमीद उर्दू प्राथमिक शाळा क्र. १३ येथे मख़दुम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी आणि रहमत सुलतान फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांना मोफत वह्या व पाट्यांचे वाटप करण्यात आले.

या वेळी मुस्कान वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष शफकत सय्यद यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, ''जिजाऊ माँसाहेब म्हणजे प्रेरणेचा स्रोत, शिक्षण आणि संस्कार यांचे मूर्तिमंत प्रतीक. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांसारखा महान योद्धा आणि राष्ट्रनायक घडवला. त्यांच्या स्मृतीनिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करणे ही स्तुत्य बाब आहे.'' कार्यक्रमाच्या प्रसंगी जिवन फाउंडेशनचे अध्यक्ष आरिफ सय्यद, राजाभैय्या, अन्नुभाई, शाळेच्या मुख्याध्यापक जबीन इनामदार, समीना खान, भाऊसाहेब चिकने, शाईस्ता शेख आदी मान्यवर उपस्थित होते.वह्या आणि पाट्या मिळाल्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे झळकत होता. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शफी हज उमरा टुर्स, राजकुमार गुरनानी, सुनील भंडारी, जीएसएम मोबाईल, मुबीन खान, डॉ. रेश्मा चेडे, युनूसभाई तांबटकर, सुनील तेलतुंबडे (रोझमॅन) आदींनी मोलाचे सहकार्य केले. आयोजकांतर्फे या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. आरिफ सय्यद म्हणाले, ''शिक्षण हा समाज परिवर्तनाचा पाया आहे. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आज दिसणारे आनंदाचे प्रतिबिंब हेच आमच्या प्रयत्नांचे खरे यश आहे. हे वाटप म्हणजे फक्त वह्यांचे नव्हे तर त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठीचा आधार आहे.'' कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आबीद दुलेखान यांनी केले तर आभार प्रदर्शन जबीन इनामदार यांनी केले.

# ट्रान्सफॉर्मर प्रकरण: शेतकऱ्यांचे महावितरण कार्यालयासमोर उपोषण सुरू



**''मिळालेला ट्रान्सफॉर्मर आम्ही काढून देणार नाही''- मा. सैनिक ढगे**

**''महावितरणच्या गलथान कारभारामुळे शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. आम्हाला मिळालेला ट्रान्सफॉर्मर आम्ही काढून देणार नाही. जर महावितरण दादागिरी करत असेल तर आम्ही लोकशाही मार्गाने लढा उभारू. ट्रान्सफॉर्मर काढून नेल्यास माजी सैनिक शेतकऱ्याला संकटांचा सामना करावा लागेल.''सध्या पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सैनिक सन्मान पंधरवडा (१५ ते ३० जून) साजरा होत आहे, आणि अशा काळात एका माजी सैनिकाला उपोषण करावे लागते, ही फार खेदाची बाब आहे,'' अशी भावना रयत क्रांती संघटनेचे तालुकाध्यक्ष मा. सैनिक संतोष ढगे यांनी व्यक्त केली.**

**अहमदनगर । प्रतिनिधी**

तालुक्यातील कोरेगाव येथील शेतकरी आबासाहेब रणसिंग यांनी वर्ष २०२२ मध्ये ट्रान्सफॉर्मरसाठी महावितरण कार्यालयात अर्ज केला होता. तीन महिन्यांनंतर त्यांना ट्रान्सफॉर्मर मिळालाही; मात्र आता महावितरण कार्यालयाने तो ट्रान्सफॉर्मर दुसऱ्या शेतकऱ्याचा असल्याचे सांगत तो परत घेण्याची तयारी सुरू केली आहे. महावितरणकडून सांगण्यात आले की, ''हा ट्रान्सफॉर्मर तुमचा नसून दुसऱ्याचा आहे. तुमचा कोटेशनचा चेक घ्या,'' अशी माहिती रणसिंग यांना देण्यात आली. या प्रकाराचा तीव्र निषेध करत आबासाहेब रणसिंग यांनी अहिल्यानगर येथील महावितरण कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे. यावेळी त्यांच्यासोबत मा. सैनिक संतोष ढगे, शिवाजी महाडिक, तुषार रणसिंग, अरविंद रणसिंग, राम नाईक, कुदांडे रणसिंग, सरस्वती रणसिंग आदी समर्थक उपस्थित होते.